# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, ३०२३३४४२/४३ फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : dtedesk2@gmail.com Internet : http://www.dtemaharashta.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/बी.फार्म. /मान्यता/२०१९/५३४६
दिनांक : 23 MAY 2019

प्रति,
प्राचार्य,
मेहमूदा शिक्षण व महिला ग्रामिण
विकास बहुउद्येशिय संस्थेचे,
सेंट्रल इंडिया कॉलेज ऑफ फार्मसी,
मौजा-लोणारा, नागपूर — ४४१ १२३

(4651)

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर सुरु असलेल्या संस्थेमध्ये नवीन पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत.

संदर्भ :१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र. वेस्टर्न/१-३५०८८३५०७६/२०१८/ईओए, दि. ३० एप्रिल, २०१८.
२.शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/प्र.क्र.१९९/तांशि-४, दि. ४ जून, २०१८

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना-अनुदान तत्वावर विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्थेमध्ये औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | बी.फार्मसी | ६० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब" या संचालनालयास सादर केलेले आहे. आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना अनुदान तत्वावर विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्थेमध्ये औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास नियतठेव म्हणून रु. ४.५० लाख पावती क्र. ४६३२८० दि. २२.५.२०१९ अन्वयें कॉर्पोरेशन बँक, शाखा - **गोढानी रेल्वे शाखा**, नागपूर , येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्थेमध्ये औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास व संबंधित विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

C:\Users\Admin\Desktop\वास्तूकल.शि.Docx

for
Principal
Central India College of Pharmacy
Lonara., Nagpur.

CENTRAL INDIA COLLEGE OF PHARMACY NAGPUR

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेतांक क्रमाक व पासवर्डद्वारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

३. शासनाने, या संचालनालयाने, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांना राहतील.

४. औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संदर्भात फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.
३. कार्यासन क्र. कार्यासन क्र.२अ मुख्य कार्यालय, मुंबई.
४. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई
५. निवड नस्तीस.

Principal
Central India College of Pharmacy
Lonara., Nagpur.

CENTRAL INDIA COLLEGE OF PHARMACY * NAGPUR *

C:\Users\Admin\Desktop\शासूकल अटार.Docx